| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | महाराष्ट्र शासन | |

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यालय,खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे (पश्चिम) - 400601

दुरध्वनी क्रमांक :- 022-2544636 Email ID :- cp.thane.buildingbr@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/ठाणे शहर/पशा/प्रंबधक/स्टेशनरी/इलेक्टीक,आयटी उपकरणे /निर्लेखन/ 70 /2025 दि.29/01/2025.

**विषय** :– ठाणे पोलीस आयुक्तलयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

...ooo...

उपरोक्त विषयान्वये ठाणे पोलीस आयुक्त कार्यालय व उपकार्यालये, तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील, निरूपयोगी, भंगार, कालबाहय झालेले संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर इलेक्ट्रीक/आयटी उपकरणे (झेरॉक्स मशिन वगळुन) आदी निर्लेखित साहित्य विक्री करण्याकरिता सुचना/जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने सोबत जाहिरात प्रसिध्द करणेकामीचा नमुना जोडण्यात आलेला असुन आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

( डॉ.श्रीकांत परोपकारी)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१) ठाणे शहर

प्रति,
प्रभारी अधिकारी, सोशल मिडीया सेल, ठाणे शहर.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यालय,खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे (पश्चिम) - 400601

दुरध्वनी क्रमांक :- 022-2544636 Email ID :- cp.thane.buildingbr@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/ठाणे शहर/पशा/प्रबंधक/स्टेशनरी/इलेक्टीक,आयटी उपकरणे /निर्लेखन/६८ /2025 दि.29/01/2025.

## जाहीर प्रगटन

ठाणे पोलीस आयुक्त कार्यालय व उपकार्यालये, तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयातील निरूपयोगी, भंगार, कालबाहय झालेले संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर इलेक्ट्रीक/आयटी उपकरणे (झेरॉक्स मशिन वगळुन) आदी निर्लेखित साहित्यांची खालील अटीवर एकत्रित विक्री करावयाचे असून त्याकरीता स्थानिक इच्छूक खरेदीदाराकडून दर मागविणेत येत आहेत सदर वस्तू व त्यांची तपशिलवार यादी इच्छूक खरेदीदारांना पाहण्यासाठी तसेच माहितीसाठी पोलीस निरीक्षक,आभियांत्रिकी कक्ष, बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर यांचे कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे. अटी व शर्ती मध्ये इच्छूक खरेदीदाराने संपूर्ण साहित्य आहे त्या ठिकाणी व आहे त्या स्थितीतच खरेदी करणे आवश्यक आहे. वजनाप्रमाणे विक्री करण्यात येणा-या वस्तुंच्या बाबतीत अधिकृत वजन काटयाचे शुल्क व इतर खर्च संबंधित खरेदीदाराकडे राहिल.

१. कार्यालयाने ठरविण्यात आलेल्या किमान विक्री किंमती एवढे अथवा त्यापेक्षा जास्त दराने खरेदी करणा-यासच वस्तूंची विक्री करण्यात येईल.
२. लोडींग अनलोडींग तसेच वाहतुकीचा संपुर्ण खर्च खरेदीदाराकडे राहिल.
३. विक्रीची एकूण रक्कम रोख अथवा धनादेशाद्वारे कार्यालयात भरणा केल्याशिवाय कोणतीही वस्तू जागेवरुन कार्यालयाचे बाहेर नेता येणार नाही.
४. वस्तू लोडींग अनलोडींग दरम्यान तसेच वाहतुकी दरम्यान कोणतीही अनुचित घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कार्यालयावर राहणार नाही.
५. विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या संपुर्ण वस्तुंची यादी कार्यालयातील पोलीस निरीक्षक,आभियांत्रिकी कक्ष, बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर यांचे कार्यालयात खरेदीदारासाठी निशुल्क उपलब्ध असून त्या यादीनुसार किमान विक्री किंमती पेक्षा जास्तीत जास्त दर सादर करणा-या खरेदीदारास वस्तुंची विक्री करण्यात येईल.
६. खरेदीदाराने आपले दर बंद लिफाफ्यात दिनांक ०५/०२/२०२५ रोजीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत पोलीस निरीक्षक,आभियांत्रिकी कक्ष, बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर यांचे कार्यालयात सादर करावेत. यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
७. सदर लिफाफ्यावर विनावापर, नादुरुस्त निर्लेखित वस्तू खरेदी करण्यासाठीचे दरपत्रक असे ठळक अक्षरांत नमुद करावे.
८. विक्री करण्यात येणा-या निरुपयोगी साहित्याचा प्रमाणात घट किंवा वाढ करण्याचे विक्री बाबतचे संपुर्ण अधिकारी व सदर विक्री प्रक्रिया कोणत्याही क्षणी रदद करण्याचे सर्व अधिकार हे पोलीस आयुक्त,ठाणे शहर कार्यालय राखून ठेवीत आहे.

( डॉ.श्रीकांत परोपकारी)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-१) ठाणे शहर

Scanned with OKEN Scanner